1) शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालयातील वर्ग-1 ते वर्ग-4 पर्यंतच्या सर्व संवर्गाच्या आस्थापनाविषयक बाबी

2) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील वर्ग-3 तांत्रिक/ अतांत्रिक व वर्ग-4 संवर्गाच्या सेवाविषयक बाबी या कार्यासनाकडून हाताळल्या जातात.

3) वर्ग-3 बाबत आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन हे नियुक्ती प्राधिकारी आहेत.

4) अधिष्ठाता हे वर्ग-4 संवर्गाचे नियुक्ती प्राधिकारी आहेत

5) वर्ग-3 व वर्ग-4 संवर्गाच्या संदर्भात नियुक्ती प्राधिकाऱ्यांच्या अधिकार कक्षेत नसलेले सर्व प्रकरणे शासनस्तरावरुन हाताळले जातात.

6) महाराष्ट्रामध्ये एकुण 3 शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय आहेत ती पुढीलप्रमाणे

अ. शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई

आ. शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर

इ. शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद

- दंत महाविद्यालय व रुग्णालयामध्ये एकुण 10 विषयाचा समावेश आहे. दंत/वैद्यकीय महाविद्यालयातील (दंत विषयातील) पदांचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे:-

| अ.क्र. | संवर्ग | मंजुर | भरलेली | रिक्त |
|---|---|---|---|---|
| 1 | सह संचालक (दंत) | 01 | 01 | 00 |
| 2 | अधिष्ठाता | 03 | 02 | 01 |
| 3 | प्राध्यापक | 45 | 27 | 18 |
| 4 | सहयोगी प्राध्यापक | 82 | 53 | 29 |
| 5 | सहायक प्राध्यापक | 124 | 50 | 74 |
| 6 | दंतशल्यचिकित्सक | 52 | 41 | 11 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 7 | एकूण | 307 | 174 | 133 |

- शासकीय वैद्यकीय / दंत महाविद्यालय व रुगालयातील वर्ग-3 व वर्ग-4 संवर्गातील पदांचा तपशील पुढीलप्रमाणे:-

| अ.क्र. | संवर्ग | मंजुर | भरलेली | रिक्त |
|---|---|---|---|---|
| 1 | वर्ग-3 तांत्रिक | 4264 | 2551 | 1713 |
| 2 | वर्ग-3 अतांत्रिक | 3054 | 1830 | 1224 |
| 3 | वर्ग-4 | 9543 | 5656 | 3887 |
| 4 | एकूण | 16861 | 10037 | 6824 |

**अ) पदभतीबाबत:**

- सामान्य प्रशासन विभागाच्या दि.04.05.2022 च्या शासन निर्णयान्वये दिलेल्या सुचनांनुसार या विभागाच्या अधिनस्थ असलेल्या वर्ग-3 संवर्गाची सरळसेवेची पदे भरण्याकरिता दि.23.06.2022 रोजी राज्यस्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे.

- विभागाच्या अखत्यारीतील संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन,अन्न व औषध प्रशासन, आयुष संचालनालय व मानसिक आरोग्य संस्थेच्या अधिपत्याखालील वर्ग-3 ची तांत्रिक/अतांत्रिक संवर्गाची व परिचर्या संवर्गातील, तसेच वर्ग-4 ची अशी एकूण साधारण 7500 सरळसेवेची पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

- प्रस्तुत प्रकरणी संस्थेची निवड करण्याकरिता Request for proposal साठी शासनाची मान्यता देण्यात आली आहे. तसेच या प्रकरणी करण्यात आलेली कार्यवाही

मा. मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणण्याकरिता नस्ती दि.02.09.2022 रोजी सादर करण्यात आली आहे.

**ब) बाह्यस्त्रोतामार्फत पदे भरण्याबाबत:-**

- वर्ग-3 व वर्ग-4 संवर्गातील सरळसेवेने पदे भरण्यास काहीसा कालावधी लागणार असल्याने सरळसेवेने पदे भरेपर्यंतच्या कालावधीत रुग्णसेवा बाधित होऊ नये याकरीता वर्ग-3 व वर्ग-4 संवर्गातील संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांच्या अधिनस्थ वर्ग-3 संवर्गातील 2368 व वर्ग-4 संवर्गातील 1911 तसेच आयुष संचालनालय यांच्या अधिनस्थ वर्ग-3 संवर्गातील 166 अशी एकुण 4445 पदे भरण्यास अपर मुख्य सचिव (सेवा) यांच्या अध्यक्षतेखालील उपसमितीने मान्यता दिली होती. त्यानुसार दि. 13.4.2022 च्या पत्रान्वये बाहयस्त्रोताद्वारे पदे भरण्यास मान्यता देण्यात आली आहे.

**क) वर्ग-3 व वर्ग-4 संवर्गातील पदांचे सुनिश्चितीकरण:**

- वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अधिनस्थ असलेल्या महाविद्यालय व रुग्णालयातील वर्ग-1 व वर्ग-2 च्या संवर्गाकरिता राष्ट्रीय वैद्यकीय परिषदेने मानके निश्चित केली आहेत. तथापि वर्ग-3 व वर्ग-4 संवर्गाकरिता अशी मानके निश्चित करण्यात आलेली नाहीत. तसेच, अनेक संस्थाकरिता पुर्वी मंजूर करण्यात आलेली वर्ग-3 व वर्ग-4 संवर्गाची पदे पुरेशी नसल्याचे निदर्शनास आले आहे. शासकीय वैद्यकीय / दंत महाविद्यालय व रुग्णालयामधील वाढती विद्यार्थी संख्या व रुग्णसंख्या विचारात घेता, तसेच, अदययावत यंत्रसामग्रीचा वाढता वापर विचारात घेता वर्ग-3 तांत्रिक / अतांत्रिक, अधिपरिचारिका व वर्ग-4 संवर्गातील पदे पुरेशी नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुसार सर्व संस्थांमधील वर्ग-3 (तांत्रिक / अतांत्रिक) अधिपरिचारिका व वर्ग-4 मधील पदांची संख्या निश्चित करुन या संवर्गाचा आकृतीबंध निश्चित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

**दंत विषयातील अध्यापकांचे सेवाप्रवेश नियम**

- दंत विषयातील अध्यापकांचे सेवाप्रवेश नियम तयार करण्याची कार्यवाही सुरु असून सदर सेवाप्रवेश नियम महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मार्च, 2021 मध्ये सादर करण्यात आले आहेत. त्यानंतर मा. आयोगाने वेळावेळी उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने पुर्तता करण्यात आली असली तरी सेवाप्रवेश नियमास अद्याप मान्यता मिळालेली नाही. सदर सेवाप्रवेश नियमा अभावी अध्यापकीय संवर्गाची सरळसेवेची पदे भरण्याची कार्यवाही प्रलंबित आहे.

- सर ज.जी. समुह रुग्णालये, मुंबई येथील बदली कामगारांनी त्यांच्या सेवा नियमित करण्याबाबत मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणात मुळ अर्ज क्र-756/2020 दाखल केला होता. सदर प्रकरणी मा. न्यायाधिकरणाने दि.14.02.2022 च्या आदेशान्वये मुळ अर्ज मान्य केला. सदर आदेशाविरुध्द शासनाच्या वतीने मा. उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.10793/2022 दाखल करण्यात आली आहे. याप्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दि.14.09.2022 च्या आदेशान्वये मा. न्यायाधिकरणाच्या आदेशास स्थगिती दिली असून पुढील सुनावणी दि.12.10.2022 रोजी आहे.